# ‘बाजी’रावी वृत्ती

मॅच-फिक्सिंग का करतात ही होतकरू पोरं? कमावलेला नावलौकिक असा करंटेपणाने का गमावतात?

अशी घोर लबाडी पचवणं हा एक प्रकारचा जुगारच आहे ना? यशाच्या शिखरावर जुगाराचं आकर्षण का वाटावं?

याच आकर्षणाचं कारण शोधायला साठ वर्षांपूर्वी अमेरिकेतल्या एका स्किनर नावाच्या मानसशास्त्रज्ञाने उंदरांवर प्रयोग केले. त्या उंदरांना तरफ दाबून नियमितपणे खाऊ मिळत होता तेव्हा त्यांना त्याची फारशी किंमत नव्हती. मग खेळाचे नियम बदलले. बऱ्याच वेळा तरफ दाबूनही खाऊ मिळालाच नाही; कधी एकाएकी भरपूर खाऊ मिळाला. ही अनियमितपणे अनपेक्षित घबाड मिळण्याची शक्यता खेळाचा भाग झाल्यापासून उंदीर झपाटलेच; पुन्हापुन्हा तरफ दाबतच राहिले. घबाड जेवढं मोठं आणि अधिक अनपेक्षित तेवढी त्याची नशा अधिक चढली.

गेल्या दशकात शास्त्रज्ञांनी पैशाचं बक्षीस लावून माणसांना संगणकी जुगार खेळायला लावला आणि त्यावेळी त्यांच्या मेंदूचा स्कॅनही केला. त्यातून समजलं की अनपेक्षित घबाड मिळाल्यावर होणारा आनंद चॉकोलेट खाल्ल्यावर किंवा कोकेनसारखे अंमली पदार्थ घेतल्यावर होणाऱ्या आनंदासारखाच असतो. त्याच्यासाठी मेंदूचे तेच विभाग आणि संदेशवाहक काम करतात. घबाड थोडक्यात हुकलं तर तो दोन बोटांवरल्या स्वर्गाचा आनंद अधिकच असतो; माणसं देहभान विसरून खेळत रहातात. सामाजिक प्रतिष्ठा आणि जुगारातली जीत यांचा आनंद एकसारखाच असतो. म्हणूनच तर सध्याच्या, पैशानेच प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या युगात युधिष्ठिरांनाच नव्हे तर भीष्मांनाही द्यूताची मोहिनी पडते. शेअरमार्केट, हेज-फंड्स वगैरेंतल्या खंद्या बाजीगरांना याच चॉकलेटची चटक लागलेली असते. मॅच-फिक्सिंगही याच जुगाराचा प्रकार आहे.

माणसाची ही उपजत जुगारी प्रवृत्ती जाणून आता इंग्लंडच्या सरकारने जुगाराला राजमान्यता दिली आहे आणि त्यावर भारी कर लादला आहे. चोवीसशे वर्षांपूर्वी कौटिलीय अर्थशास्त्रानेही असाच सल्ला दिला होता!

पण या उपजत प्रवृत्तीच्या समाधानासाठी पैसे पणाला लावून सट्टाच खेळावा लागतो असं नाही. नोकरी सोडून व्यवसायात शिरणं, इंजिनीयर न होता सीए व्हायचं ठरवणं यांसारखे रोजच्या जगण्यातले महत्त्वाचे निर्णय घेतानाही एक संधी मिळवण्यासाठी आपण दुसरी

शक्यता पणाला लावतो. नव्या मित्रमैत्रिणीवर छाप पाडतानाही भावनिक सारीपाट खेळला जातो. वधूवरसूचक मंडळाने सुचवलेल्या स्थळाला जीवनाचा जोडीदार म्हणून निवडणं हा आयुष्यातला सगळयात मोठा मटका असतो. भविष्यातल्या अनिश्चित आनंदाची आशा हा जुगार आणि पर्यायाने सगळंच जीवन चालू ठेवते.

झाशीच्या स्वातंत्र्यासाठी लढणारी लक्ष्मीबाई, शिणलेल्या डोळ्यांनी रात्रंदिवस मलेरियाचे जंतू शोधणारा रॉस यांसारखी असामान्य ध्येयधुंद माणसं त्याहूनही मोठा जुगार खेळतात. केवळ एका ध्यासासाठी ती उभं आयुष्य पणाला लावतात. माणसाच्या उपजत जुगारी प्रवृत्तीला तशा ध्यासाचा परीसस्पर्श झाला की तिचं बावनकशी सोनं होतं आणि त्याच्या तेजाने सारं जग उजळून निघतं. त्यांचा अंतिम आनंद चॉकोलेटासारखा नसतो; तो अमृताते पैजा जिंकतो.

- डॉ. उज्ज्वला दळवी

- ujjwalahd9@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : ’ई-सकाळ’ १५ जून २०१३)